२८. पाऊल

बरेच वर्षांपूर्वी ही गोष्ट वाचली होती. २ जुळी शहरे होती. त्यांच्यामध्ये एक दाट जंगल होते. एकदा दोघे वाटसरू दुस-या शहराला निघतात. त्यांचा चालण्याचा अंदाज चुकतो. संध्याकाळच्या वेळेला एक शहर पार करून जंगला जवळ येतात. रात्रीच्या वेळी जंगल पार करणे त्याना भीतीदायक वाटते. त्यांच्याजवळ बॅटरी असते. ते विचार करतात की जंगलात गेलो तर जंगली प्राण्यांकडून धोका, इथेच थांबलो तर चोरीचे भय. काय करावे त्यांना सुचत नाही.

तेवढयात एक म्हातारी तुरूतुरू चालत एका हातात कंदील , दुस-या हातात काठी अशी येते. ते दोघे म्हातारीला हटकतात व विचारतात की तुला भीती वाटत नाही का ? म्हातारी सांगते त्यात काय भ्यायचेय ? मी रोजच ह्या वेळेला जंगल पार करते. मी पलीकडच्या शहरात राहते व रोज या शहरात कामाला येते आणि भ्यावयाचे कशाला ? माझ्या हातात काठी आहे. हातात कंदील आहे. जो मला प्रकाश दाखवितो. एक तरूण म्हणतो कि कंदीलाचा काय असा प्रकाश पडणार ?

म्हातारी म्हणते की आपण एकावेळेला किती पावले टाकतो. एकच ना. मग एक पाऊल टाकण्यासाठी जेवढा प्रकाश आवश्यक आहे तेव्हढा प्रकाश माझा कंदील मला देतो. चला येताय का माझ्या सोबतीने का बसताय इथेच ?

मित्रानो ते तरूण म्हातारीबरोबर जातात कि नाही हे फारसे महत्वाचे नाही. पण ही गोष्ट आपल्याला खूप काही सांगून जाते.

१. माणसाने शेवटपर्यंत कार्यरत राहीले पाहिजे. असे केल्याने माणसाचे शरीर व मन / बुद्धि तल्लख राहते.

२. कामधंदा राहत्या जागी / शहरी मिळेल असे नाही. त्यासाठी दूरवर जायची तयारी असणे आवश्यक.

३. भीती ही मनाची अवस्था आहे. शेवटी मरण सर्वांनाच येणार आहे. वाघ म्हटला तरी खातो आणि व्याघ्या म्हटला तरी खातो अशी एक म्हण आहे. त्यामुळेच भीतीवर मग ती कोणतीही असो आपल्याला मात करता आली पाहिजे. त्यासाठी ज्या गोष्टीची भीती वाटते ती गोष्ट केली पाहिजे अगदी सतत न कंटाळता. हा सरावच माणसाला भीतीमुक्त करतो.

४. आपल्याकडे काय आहे ह्याचा अंदाज घेता आला पाहिजे. उ.दा. म्हातारीकडे काठी होती. जरी आपल्याला माहिती आहे की जंगली प्राण्याला मारायला काठी पुरेशी नाही पण जंगली प्राण्याला कोठे माहितेय की ही नुसती काठीच आहे. ही काठी आपले काहीही वाकडे करू शकणार नाही. सिनेमात नाही का नायक रिकाम्या पिस्तुलाने खलनायकाला घाबरवितो. त्यातलाच हा प्रकार.

५. एखादी गोष्ट करण्यापूर्वी संपूर्ण आराखडा बनविणे आवश्यक आहे. ह्या २ तरूणांचे नेमके हेच चुकले. आपल्याला किती अंतर चालायचे आहे. आपण किती तास चालू शकतो ,किती वेगाने चालू शकतो ह्याचे

गणित चुकले म्हणून त्यांना जंगलाच्या सीमारेषे पर्यंत पोचता आले. त्यांनी खरेच प्लॅनिंग केले होते का की त्यांचा अतिउत्साह होता ? आपण एखाद्या कामात कमी पडतो तेव्हा हे तर कारण नसते ?

६. आयुष्यात आपल्याला ब-याच गोष्टी कराव्याशा वाटतात पण काही गोष्टींचा अवाका एवढा मोठा असतो की संपूर्ण आयुष्य खर्ची घातले तरी ओंजळभर ज्ञानसुद्धा मिळत नाही. अशावेळी मनात नकारात्मक विचार येतात. हे कसे काय आपल्याला जमेल बुवा . मित्रांनो अशावेळी म्हातारीचा एका वेळेला एकच पाऊल आपण टाकतो हा सल्ला खूप महत्वाचा आहे. कोणतीही गोष्ट, कला साध्य करायची म्हणजे एक मोठा प्रवासच असतो आणि आपण प्रवास जसा टप्प्याटप्याने करतो त्याप्रमाणे आपण ती गोष्ट साध्य करण्यांसाठी मार्गक्रमणा केली पाहिजे. एका वेळेला एक पाऊल. काही पावले चालल्यानंतर आपोआपच मनात विश्वास निर्माण होईल. मनातील भीती कमी होईल. आपण मनात आणले तर करू शकतो म्हणून समाधान वाटेल व कोणत्याही बदलासाठी आपण तनमनाने सज्ज होवू.

काय मित्रांनो कशी वाटली गोष्ट ?

एक म्हातारीची आणि त्यातून मी काढलेल्या अर्थाची ? काय करायचा प्रयत्न?